|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
उमवि नगर, जळगाव-४२५००१ फोन: ०२५७-२२५७२७६, २२५७२७७फॅक्स: ०२५७-२२५८४०३, ४०६,
Umavinagar, Jalgaon Tel Nos. : 0257-2257276 to 2257277, Fax Nos.:0257-2258403, 406
Web : www.nmu.ac.in E-mail : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in

जा.क्र. कबचौउमवि/१८/१००/२०२५ दि. २९/०१/२०२५

**सुधारीत पत्र**

प्रति,
मा.प्राचार्य/प्राचार्या,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
कला,विज्ञान,विधी, शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालये
जळगाव, धुळे आणि नंदूरबार

विषय:- उन्नत अभिवृध्दी योजनेअंतर्गत (CAS) पदोन्नतीचा प्रस्ताव सादर करतांना संस्थेचा ठरावाची मागणी न करण्याबाबत.

संदर्भ:- विद्यापीठाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/९८/८०/२०२५ दिनांक:- २५/०१/२०२५ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार उन्नत अभिवृध्दी योजनेअंतर्गत (CAS) पदोन्नतीचा प्रस्ताव सादर करतांना संस्थेचा ठरावाची मागणी न करण्याबाबत पत्र निर्गमित करण्यात आले आहे. सदरचे पत्र निरस्त करण्यात येत असून सुधारीत पत्र खालील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे :-

विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठाशी संलग्नीत कला, विज्ञान,वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापकांना उन्नत अभिवृध्दी योजनेअंतर्गत सहायक प्राध्यापक (Assistant Professor), सहयोगी प्राध्यापक (Associate Professor) आणि प्राध्यापक (Professor) या पदावर पदोन्नती करतेवेळी किंवा प्रस्ताव सादर करतांना संस्थेचा ठराव घेण्याची आवश्यकता नाही, असा ठराव पारीत करण्यात आलेला आहे. कृपया सदर ठरावाची नोंद घ्यावी

याअनुषंगाने प्राप्त आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, महाविद्यालय/परिसंस्थेतील उन्नत अभिवृद्धी योजना (CAS) अंतर्गत सहायक प्राध्यापक (Assistant Professor) पदावरून सहयोगी प्राध्यापक (Associate Professor) व सहयोगी प्राध्यापक (Associate Professor) पदावरुन प्राध्यापक (Professor) पदावर विद्यापीठाच्या निवड समिती मार्फत पदोन्नती दिलेल्या प्राध्यापकांचा प्रस्ताव मान्यतेसाठी विद्यापीठाकडे सादर करतांना संस्थेचा ठराव जोडण्याची आवश्यकता नाही तसेच सदर बाब आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधितांच्या व शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(व्याख्याता मान्यता विभाग)

प्रत माहितीसाठी-
१. मा. कुलगुरु महोदय, कबचौउमवि,जळगाव २. मा. प्र. कुलगुरु महोदय, कबचौउमवि,जळगाव
३. मा. कुलसचिव महोदय, कबचौउमवि,जळगाव

staffapp\ext.let.25\PN.17